विविध योजनांतर्गत राज्यातील बिज परिक्षण प्रयोगशांळांचे बळकटीकरण

शेतक-यांना उपलब्ध होणा-या निवनष्ठा योग्य दर्जाच्या असणे उत्पादन वाढीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. निविष्ठांचे उत्पादन, साठवण, पुरवठा, विक्री इत्यादींचे नियमन करण्यासाठी केंद्र शासनाने विविध कायदे संमत केलेले आहेत. बि-बियाणे अधिनियम, १९६६ बियाणे नियम, १९६८, बियाणे (नियंत्रण) आदेश,१९८३ या कायद्याच्या अंमलबजावणी करीता विविध बियाणे नमुन्यांची गुणवत्ता तपासणी वेगवेगळ्या स्तरावर आवश्यक ठरवलेली आहे. त्यासाठी संबंधित कायद्यातर्गत प्रयोगशाळा स्थापित करण्यात आलेल्या आहेत.

राज्यामध्ये बि-बियाणे तपासणीसाठी पुणे, परभणी व नागपूर या ठिकाणी बिज परिक्षण प्रयोगशाळा स्थापित करण्यात आलेल्या आहेत.

शासनाच्या या तीन प्रयोगशाळांव्यतिरीक्त महाराष्ट्र राज्या बिजप्रमाणिकरण यंत्रणेच्या अधिपत्याखाली औरंगाबाद व अकोला येथे दोन बिज परिक्षण प्रयोगशाळा कार्यरत आहेत.

बिज परिक्षण प्रयोगशाळा :-

कोणत्याहि पिकाचे अधिक उत्पादन मिळविण्यासाठी अधिक उत्पादन देणा-या संकरित, सुधारित जातींची लागवड करावी लागते. तसेच पेरणीसाठी वापरावयाचे बियाणे शुद्ध व दर्जेदार असावे लागते. या मुलभूत बाबींचा विचार करून सन १९६६ च्या दरम्यान पिकांच्या नविन जातींच्या पैदाशीबरोबरच दर्जेदार बियाणे शेतक-यांना उपलब्ध होण्यासाठी शासनाने बियाणे कायदा करून त्या अंतर्गत बियाणे प्रमाणिकरण यंत्रणा, बिज परिक्षण प्रयोगशाळा स्थापन केल्या आहेत.

पेरणीसाठी प्रमाणित बियाणे वापरणे अतिशय योग्य, तथापि सुदारित जातींचे सत्यप्रत बियाणे अनेक बियाणे उत्पादक कंपन्या उपलब्ध करून देतात. या सत्यप्रत बियाण्याच्या बाबतीत त्याच्या दर्जाची हमी उत्पादकाने खरेदीदाराला दिलेली असते. यावर विसंबून शेतकरी बाजारातून बियाणे खरेदी करतात. याशिवाय शेतकरी आपले चांगले बियाणे पुढील हंगामासाठी राखून ठेवतात, प्रसंगी ते इतरांनाही विकत देतात. सामान्य: शेतक-यांनी इतर शेतक-यांना देऊ केलेल्या बियानांची प्रत प्रयोगशाळेत तपासणी झालेली नसते. या बियाणांच्या दर्जाबाबत कोणतीही खात्री दिलेली नसते केवळ एकमेकांच्या विश्वासावर हे बियाणे खरेदी केले जाते, म्हणून अशा बियाणांची पेरणीपुर्वी तपासणी करणे आवश्यक आहे.

बियाणे कायदा १९६६, कलम ४(२) अन्वये राज्यातील बिजपरिक्षण प्रयोगशाळा अस्तित्वात आलेल्या आहेत. राज्य शासनाच्या अधिपत्याखाली पुणे, औरंगाबाद, परभणी, अकोला व नागपूर येथे बीज परिक्षण प्रयोगशाळा अस्तित्वात होत्या. त्यापैकी औरंगाबाद व अकोला येथील बिजपरिक्षण प्रयोगशाळा बिज प्रमाणिकरण यंत्रणेकडे वर्ग करण्यात आलेल्या आहेत. सध्या पुणे, परभणी व नागपूर येथील प्रयोगशाळा कृषि विभागाच्या अखत्यारीत आहेत. सदर प्रयोगशाळांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अनु क्र.	बिजपरिक्षण प्रयोगशाळा	स्थापनेचे वर्ष	प्रयोगशाळेचे नांव व पत्ता व दूरध्वनी क्रमांक	क्षमता	जिल्हे
१	नागपूर	१९६४-६५	बिजपरिक्षण प्रयोगशाळा नागपूर, कृषिमहाविद्यालय चोक, महाराजबाग, सिव्हील लाऊन्स, नागपूर-१, दू.क्र.०७१२-२५६४२१३	१६०००	अमरावती यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशिम, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली.
२	पुणे	१९६८-६९	बिजपरिक्षण प्रयोगशाळा पुणे, कृषिभवन, शिवाजीनगर, पुणे-४११००५, दू.क्र.०२०-२५५३६४४९	१६०००	पुणे, अ.नगर, सोलापूर, बृहनमुंबई, मुबंई उपनगरे, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, नाशिक, धुळे, जळगांव, नंदुरबार, सातारा, सांगली, कोल्हापूर
४	परभणी	१९८३-८४	बिजपरिक्षण प्रयोगशाळा परभणी, मार्केटयार्ड, नवामोंढा, परभणी दू.क्र.०७२१-२२१४०९	१६०००	औरंगाबाद, जालना, बीड, नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली, उस्मानाबाद.
			अकूण	४८०००	

विल सर्व प्रयोगशाळांमध्ये शेतक-यांकडून पाठविण्यात येणारे बियाणांचे नमुने विश्लेषण करून त्यांचे अहवाल पाठविण्याची सुविधा उपलब्ध आहे. कृषि विभागाकडूल प्रयोगशाळांमध्ये शेतक-यांच्या बियाणे नमुन्याबरोबरच बियाणे कायद्यांतर्गत बियाणे निरिक्षकांनीं काढलेले नमुने तसेच बिजप्रमाणीकरण यंत्रणेने पाठविलेले नमुनेही तपासले जातात. कायद्यांतर्गत पाठविलेल्या नमुन्यास कोणतेही शुल्क आकारले जात नाही. प्रमाणिकरण व शेतक-यांच्या नमुन्यांना नाममात्र शुल्क आकारले जेते. सध्या ते केवळ रुपये ४०/- प्रति नमुना अशी आहे. प्रयेगशाळेत तपासणीसाठी पाठवावयाच्या नमन्नयाबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	बियाणे नमुन्यांचे आवश्यक वजन	पिक
१	१००० ग्रॅम्स	गहु, मका, एरंडी, भुईमूग, करडई, सोयाबिन, सूर्यफूल, कपाशी, ओट, टरबूज, भेंडी, हरडरा, चवशी, तूर, कारले, दोडका, पडवळ.
२	९०० ग्रॅम्स	ज्वारी
३	४०० ग्रॅम्स	धान
४	३५० ग्रॅम्स	कपाशी (तंतु विरहित), भपळा.
५	३०० ग्रॅम्स	जवस, मुळा.
६	२५० ग्रॅम्स	संकरीत सूर्यफूल, कांदा बल्ब, चुका, रताळे
७	१६० ग्रॅम्स	मोहरी
८	१५० ग्रॅम्स	वांगे, खरबूज, मिरची
९	१०० ग्रॅम्स	ज्युट, कोबी, फुलकोबी, नवलकोल
१०	७० ग्रॅम्स	डोमॅटो, तीळ
११	५० ग्रॅम्स	लसूण
१२	२५ ग्रॅम्स	तंबाखु
१३	७ ग्रॅम्स	संकरीत टोमॅटो

प्रयोगशाळेमध्ये प्रामुख्याने बियाण्याची भोतिक शुद्धता व उगवण शक्ती तपासली जाते. कायद्यांतर्गत काढलेल्या नमुनांची आवश्यकतेनुसार अनुवंशिक शुद्धताही तपासता येते. बियाणातील आद्रता, ओलावा, स्वास्थ्य या बाबी देखील तपासता येतात. बियाणे उत्पादनामध्ये योग्यती काळजी घेऊन अनुवंशींक व भोतिकदृष्ट्या शुद्ध बियाणे पुरविण्याची जबाबदारी उत्पादकाची आहे. यासाठी वरील प्रत्येक बाबतीत पीक निहाय प्रमाणके शासनाने ठरवून दिलेली आहेत. त्याप्रमाणे बियाणे असल्याची खात्री करून तसे लेबल व सील लावण्याचे कायदेशीर बंधन उत्पादकांवर आहे.

बिटी कापूस बियाणे तपासणिची सुविघा बिज परिक्षण प्रयोगशाळा पुणे व नागपूर येथे उपलब्ध आहे. बिज परिक्षण प्रयोगशाळा पुणे येथे बीटी कापूस तपासणीसाठी पुणे, अहमदनगर, कोल्हापूर, सोलापूर, सातारा, सांगली, नाशीक, धुळे, नंदूरबार व जळगांव इत्यादी जिल्ह्यातून बीटी कापूस बियाणे तपासणीसाठी येतात.

बिज परिक्षण प्रयोगशाळा, नागपूर तेथे बीटी कापूस तपासणीसाठी लातूर परभणी हिंगोली, नांदेड, औरंगाबाद, जालना, उस्मानाबाद, बीड, नागपूर, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, अमरावची, बुलढाणा, अकोला, यवतमाळ व वाशिम इत्यादी जिल्ह्यातून बीटी कापूस बियाणे तपासणीसाठी येतात.

<u>प्रयोगशाळेत मागिल ५ वर्षात केलेली कार्यवाही.</u>

अ.क्र	वर्ष	वार्षिक तपासणी क्षमता	प्राप्त नमुने	तपासलेले नमुने	अप्रमाणित नमुने	अप्रमाणित नमुन्यांचे प्रमाण
१	२००८-२००९	४८०००	४३७३२	३९१८५	३९१८५	७.२९
२	२००९-२०१०	४८०००	३८४०६	३७२९३	३२३०	८.६६
३	२०१०-२०११	४८०००	३२३७५	३१४२७	४६०५	१४.६५
४	२०११-२०१२	४८०००	३७१७१	३६५२२	३६३९	९.९६
५	२०१२-२०१३ (जानेवारी-१३)	४८०००	३२७४०	३१३२८	२२६०	७.२१

कृति आराखडा अंतर्गत प्रयोगशाळानिहाय झालेल्या सन २०१२-१३ माहे. जानेवारी-२०१३ अखेर खर्चाची माहिती पुढीलप्रमाणे.

अ.क्र.	प्रयोगशाळेचे नांव	साध्य
१	बिज परिक्षण प्रयोगशाळा, पुणे	११.३०
२	बिज परिक्षण प्रयोगशाळा, परभणी	६.३५
३	बिज परिक्षण प्रयोगशाळा, नागपूर	१६.८०
एकूण		३४.५४

<u>बियाणे जनुकीय तपासणी सुविधा</u> :-

बिज परिक्षण प्रयोगशाळा पुणे, परभणी व नागपूर येथे बियाणांची जनुकीय तपासणी करण्याची सुविधा निर्माण करण्यात आलेली आहे. त्यामुळे बियाण्यांची अनुवंशिक शुद्धता तपासण्यासाठी लागणारा कालावधी (५० ते १०० दिवस)

कमी होऊन सदर सुविधेमुळे त्याऐवजी चार दिवसांमध्ये तपासणी करणे शक्य होणार आहे. त्याकरीता राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत प्राप्त निधीतून सदर प्रयोगशाळेची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर प्रयोगशाळेत निर्माण करण्यात आलेल्या सुविधामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

१. प्रयोगशाळा गौण बांधकाम.
२. विद्युतीकरण
३. फर्निचर
४. उपकरणे
५. प्रशिक्षण

पुढील तीन वर्षाचे नियोजन

- बिज परिक्षण प्रयोगशाळा, पुणे/परभणी येथे ईस्टा नार्म प्रमाणे अद्यावत अंकुरण कक्ष निर्माण करणे.
- बिज परिक्षण प्रयोगशाळा, परभणी येथे स्वतंत्र जनरेटर रूमची निर्मीती करणे.
- पुणे, परभणी, नागपूर येथील बिज परिक्षण प्रयोगशाळांना ईस्टा मानांकन प्राप्त करून घेणे गुणवत्ता नियंत्रणासाठी तपासणी करीता येणा-या नमुन्याची माहीती जलद गतीने संबंधीत निरीक्षकांना व विक्रेत्यांना उपलब्ध होण्यासाठी अद्यावत संगणकीय प्रणाली विकसीत करणे.